# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर

शासकिय तंत्रनिकेतन परिसर, सदर, नागपूर

दुरध्वनी क्रं.:- ०७१२-६४६५१४५/१४६, फॅक्स क्रं.:- ०७१२-२५६१६६३

Web Site :- www.rdtenagpur.org.in E-Mail :- ronagpur.dte@gmail.com

**अति तात्काळ**

**क्रमांक :- तंशिसं/विकाना/शैवि-३/जावैप्र /२०१५/** 367

**दिनांक :-** 3 FEB 2015

**प्रति,**

**संचालक/प्राचार्य,**
**सर्व शासकीय अशासकीय अनुदानित व विना अनुदानित**
**पदवी व पदव्युत्तर पदवी व्यावसायिक संस्था**
**नागपूर विभाग, नागपूर.**

**विषय :- शैक्षणिक वर्ष २०१४-१५ मधील व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेश घेतलेल्या मागासवर्गीय उमेदवारांच्या जात वैधता पडताळणी प्रमाणपत्र सादर न केलेल्या उमेदवारांचे प्रवेश रद्य करणेबाबत.**

**संदर्भ :- १) उच्च व तंत्रशिक्षण विभाग शासन पत्र क्र. संकीर्ण २०१३/प्र.क्र.१९१/तांशि-४, दि.२२.०५.२०१४**
**२) मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा.,मुंबई यांचे पत्र क्र. २अ/एडीएम/२०१४/४१, दि. ०८.०१.२०१५**

उपरोक्त संदर्भांकित पत्रान्वये आपणांस कळविण्यांत येते की, संदर्भ क्र. १ अन्वये दिलेल्या आदेशानुसार शैक्षणिक वर्ष २०१४-१५ मधील अभियांत्रिकी/औषधनिर्माणशास्त्र/वास्तशास्त्र/हॉटेल मॅनेजमेंट व कॅटरींग टेक्नालॉजी, एमबीए/एमसीए/पीजीडीएम व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये प्रवेश घेतलेल्या मागासवर्गीय उमेदवारांना **जात वैधता प्रमाणपत्र** सादर करण्यासाठी दि. ३०.११.२०१४ पर्यातची परवानगी दिलेली होती परंतु उमेदवारांजवळ जात वैधता नसल्यामुळे त्यांनी प्रोफार्मा एच सादर करुन प्रवेश निश्चित केलेला होता अशा उमेदवारांचे प्रवेश दि. ३०.११.२०१४ पर्यंत रद्य करण्याची कार्यवाही करण्यांत येवू नये असे कळविण्यांत आलेले होते.

**शासनाने संदर्भ् क्र. १ अन्वये दिलेली मुदत संपुष्टात आलेली असल्यामुळे प्रवेश घेतलेल्या मागासवर्गीय उमेदवारांपैकी जे उमेदवार जात वैधता प्रमाणपत्र दि. ३०.११.२०१४ पर्यंत सादर करु शकलेले नाहीत अशा उमेदवारांचे प्रवेश रद्य करण्याबाबत कार्यवाही कां करण्यांत येऊ नये याबाबत कारणे दाखवा नोटीस सर्व उमेदवारांना देण्याबाबतची कार्यवाही आपल्या स्तरावर करण्यांत यावी.**

**(गुलाबराव ठाकरे)**
**सहसंचालक,**
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
नागपूर

प्रत - :- १) मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा.,मुंबई (का.क्र. २अ) यांना माहितीस सविनय सादर.
२) प्रोग्रामर यांना आवश्यक कार्यवाहीस्तव. त्यांनी सदर पत्र कार्यालयाचे वेबसाईडवर प्रकाशित करावे.